॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे


*** सुविचार ***

कष्ट आणि प्रयत्नाशिवाय यश कधीच मिळत नाही.


■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. २३ जुलै २०२६ | ■ वर्ष ७ वे ■ अंक ४७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये | ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com


## SPOT NEWS

### मुसळधार पावसामुळे वैष्णोदेवी, अमरनाथ यात्रा स्थगित

● **नवी दिल्ली** – जम्मू कश्मिर आणि उत्तराखंडमध्ये सध्या मुसळधार पाऊस पडत असून त्यामुळे अचानक येणारे पूर, ढगफुटी आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. वैष्णो देवी मंदिर, अमरनाथ यात्रा आणि चारधाम यात्रेवर परिणाम झाला आहे. जम्मूतील वैष्णो देवी यात्रा आणि काश्मीरमधील अमरनाथ यात्रा मुसळधार पाऊस, अचानक आलेला पूर आणि ढगफुटीमुळे प्रभावित झाली आहे. त्यामुळेच सलग चौथ्या दिवशी या दोन्ही यात्रा स्थगित झाल्या आहेत. जम्मू आणि कश्मिरमध्ये मुसळधार पावसामुळे सोमवारी वैष्णो देवीचे पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या अर्धकुमारी भवनकडे जाणा–या नवीन मार्गावर मोठे भूस्खलन झाले. यामुळे, या मार्गावरील यात्रेकरूंची वाहतूक आणि बॅटरी कार सेवा स्थगित करण्यात आली. वैष्णो देवीच्या भाविकांना नेहमीच्या मार्गाने जाण्यास सांगण्यात आले आहे. तेथील शाळाही २६ जुलैपर्यंत बंद आहेत.

### अहिल्यानगर जिल्ह्यात अतिवृष्टीची शक्यता

● **अहिल्यानगर** – भारतीय हवामान विभागाने आज दि. २२ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे. जिल्ह्यातील धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष दळवी यांनी केले आहे. आज दुपारी १ वाजता भिमा नदीत दौंड पुलावरून १० हजार ९३८ क्युसेक, घोड नदीत घोड धरणातून ४ हजार क्युसेक, तर गोदावरी नदीत नांदूर मध्यमेश्वर धरणातून ४ हजार ७६९ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. अहिल्यानगर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस झाल्यास भिमा, घोड आणि गोदावरी नद्यांच्या पाणीपातळीत मोठी वाढ होऊ शकते. तसेच जिल्ह्यातील भंडारदरा, निळवंडे आणि मुळा धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असून धरणांमध्ये पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे गोदावरी, भिमा, घोड, प्रवरा आणि मुळा नदीकाठच्या नागरिकांनी तसेच धरण परिसरात पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी.

# राज्यातील ५३३ शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर

## शेतकरी कर्जमाफी, प्रातिनिधीक यादीस सुरुवात । ही आजवरची राज्यातील सर्वांत मोठी कर्जमाफी योजना : बाबासाहेब पाटील

● **मुंबई । वीरभूमी–**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पहिली जयंती याचे औचित्य साधत राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र ५३३ शेतकऱ्यांची पहिली प्रातिनिधीक यादी जाहीर केली. मंत्रालयात आयोजित सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी याबाबतची घोषणा केली. राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. महात्मा फुले शेतकरी कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या १२ लाख शेतकऱ्यांनाही २ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.

आजपर्यंतची सगळयात मोठी अशी ही ऐतिहासिक कर्जमाफी योजना असणार असल्याचे बाबासाहेब पाटील म्हणाले. कर्जमाफी योजनेसाठी ४० हजार ९८० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. त्यानंतर नुकत्यात पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ही योजना आणखीन विस्तारित करण्यात आली.

महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांचाही समावेश यात करण्यात आला. आता बुधवारी अधिकृतरित्या प्रातिनिधीक स्वरूपात सात जिल्ह्यातील निवडक ५३३ पात्र लाभार्थ्यांची यादी प्रसिध्द करण्यात आली. लाभार्थी शेतक–यांची यादी आणि लाभ वितरणाची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक करण्यात आली आहे. ही योजना केवळ कर्जमुक्ती नसून शेतकऱ्यांवरील



आर्थिक ताण कमी करुन त्यांना नव्या जोमाने शेती करता यावी यासाठी आमचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. यापूर्वी कर्जमाफी झाल्यास शेतकऱ्याला कर्ज मिळत नव्हते.

आता कर्जमाफी झाल्यानंतर त्या शेतकऱ्यांना कर्ज दिले पाहिजे अशी कायदेशीर तरतूद करण्यात आली असल्याचेही बाबासाहेब पाटील म्हणाले. शेतीबाहय उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार नाही. त्याबाबत केंद्र सरकारशी सातत्याने संपर्क सुरू असून त्यासाठी खास अधिकारीही नेमण्यात आला आहे. ही आकडेवारी आल्यानंतर एकदोन दिवसांत संपूर्ण यादी प्रसिदध करण्याचा सरकारचा प्रयत्न असणार आहे. यादी प्रसिदध झाल्यानंतर काही आक्षेप असल्यास जिल्हास्तरावरील समितीकडे अपील करता येईल. तिथे समाधान न झाल्यास राज्य स्तरावर त्याचे निराकरण करण्यात येणार आहे. ज्या शेतकऱ्यांची रक्कम २ लाखापेक्षा जास्त आहे. त्यांना वरची रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत भरावी लागणार आहे. त्यानंतर त्यांना २ लाखापर्यंतच्या रकमेचा लाभ मिळणार आहे.

### अशी होणार कर्जमाफीची प्रक्रिया?

■ यादीतील लाभार्थ्यांना त्यांच्या मोबाईलवर आधार प्रमाणिकरण करण्याबाबत एसएमएस पाठविण्यात येणार आहे. तसेच सदरच्या याद्या गावपातळीवर ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सहकारी संस्था कार्यालय तसेच संबंधित बँकेच्या शाखेत प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर यादीमध्ये पात्र शेतकऱ्यांना एक विशिष्ट क्रमांक देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना त्याचे आधार क्रमांक किंवा विशिष्ट क्रमांकाच्या आधारे आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे. राज्यात सध्या कार्यरत असलेल्या सुमारे ३२ हजार आपले सरकार सेवा केंद्रातून पात्र लाभार्थ्यांनी आधार प्रमाणिकरण करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. याप्रमाणे आधार प्रमाणिकरण करणेपूर्वी शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक वरील नोंदणी आवश्यक आहे. आधार प्रमाणिकरण झाल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांच्या कर्जखात्यावर लाभाची रक्कम डीबीटीव्दारे हस्तांतरित करण्यात येणार आहे.

# शरद पवार-सुप्रिया सुळे यांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे नीट परीक्षेतील अनियमिततेवरून कॉक्रोच जनता पार्टीने सुरू केलेल्या आंदोलनाच्या आणि गदारोळाच्या पार्श्वभूमीवर एक मोठी राजकीय बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी संसद भवनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.



शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी जंतरमंतरवर पोहोचून सीजेपी आणि आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चळवळीला उघडपणे पाठिंबा दिल्यानंतर आणि पोलिसांच्या कारवाईचा निषेध केल्यानंतर अवघ्या एका दिवसात ही भेट झाली आहे. संसदेच्या अधिवेशनादरम्यान झालेल्या या उच्चस्तरीय भेटीमुळे अनेक तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

कॉक्रोच जनता पार्टीचे हे आंदोलन २० जूनपासून सुरू आहे. स्पर्धा परीक्षांमधील अनियमिततेसाठी जबाबदारी निश्चित करणे, शिक्षण व्यवस्थेत सुधारणा आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी ही संघटना करत आहे.


या मोर्चाच्या शक्यतेने, दिल्ली पोलिसांनी नवी दिल्ली परिसरात बीएनएसएसचे कलम १६३ लागू केले आणि स्पष्ट केले की सरन्यायाधीशांना संसदेकडे मोर्चा नेण्याची परवानगी नाही. हजारो विद्यार्थी आणि आंदोलकांनी जंतरमंतरपासून संसदेकडे मोर्चा नेण्याचा प्रयत्न केला असता, पोलिसांनी त्यांना अडवून थांबवले. जमावावर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज आणि अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर केला. या संघर्षात अनेक आंदोलक आणि पोलिस अधिकारी जखमी झाले आहेत.

# भंडारदरा ७९ टक्क्यांवर; आढळा धरण दोन दिवसांत भरण्याची शक्यता

## पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस । निळवंडेच्या साठ्यातही झपाट्याने वाढ

● **अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील भंडारदरा पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम असून धरणांच्या पाणीसाठ्यात वेगाने वाढ होत आहे. बुधवारी (दि. २२) सायंकाळी ६ वाजेपर्यंत भंडारदरा धरणात ८,७३५ दशलक्ष घनफूट (७९.१३ टक्के) पाणीसाठा झाला आहे. सध्याचा पावसाचा वेग कायम राहिल्यास ३१ जुलैपूर्वी भंडारदरा धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



निळवंडे धरणात ३,३३१ दशलक्ष घनफूट (३९.९७ टक्के) पाणीसाठा झाला असून साठ्यात जलद गतीने वाढ होत आहे. आढळा धरणात ९६२ दशलक्ष घनफूट (९०.७५ टक्के) पाणीसाठा झाला असून हे धरण येत्या दोन दिवसांत पूर्ण भरण्याची शक्यता आहे.

दरम्यान, वाकी लघुपाटबंधारे तलाव ओव्हरफ्लो झाला असून तेथून २,१९९ क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे निळवंडे धरणाच्या पाणीसाठ्यात आणखी वाढ होत आहे.

बुधवारी सकाळी ६ वाजेपर्यंत घाटघर येथे १८५ मिमी, रतनवाडी येथे १७४ मिमी, पांजरे येथे १६० मिमी, भंडारदरा येथे १२९ मिमी, वाकी येथे १२२ मिमी, अकोले येथे १४ मिमी आणि आढळा येथे १२ मिमी पावसाची नोंद झाली.

चार दिवसांपूर्वी हरिश्चंद्रगड परिसरात दरड कोसळून चार पर्यटक जखमी झाल्याच्या घटनेनंतर सुरक्षेच्या कारणास्तव हरिश्चंद्रगडावर पर्यटकांना जाण्यास अद्याप बंदी कायम ठेवण्यात आली आहे. दरम्यान, आदिवासी भागात समाधानकारक पावसामुळे भात आवणीच्या कामांना वेग आला असून शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त झाले आहेत.

# ६ खासदारांच्या विलीनीकरणाला स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार!



● **नवी दिल्ल । वीरभूमी–**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ६ खासदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीन करण्याच्या लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात आज (दि. २२) सुनावणी पार पडली. या प्रकरणी न्यायालयाने लोकसभा अध्यक्षांना नोटीस बजावत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि आलोक अराधे यांच्या खंडपीठाने सहा खासदारांच्या शिवसेना शिंदे गटात विलीनीकरणाला तात्काळ स्थगिती देण्यास नकार दिला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता दोन आठवड्यांनंतर होणार आहे.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी १८ जून रोजी ठाकरे गटाच्या सहा खासदारांचे शिंदे गटात विलीनीकरण करण्यास मान्यता दिली होती. यामध्ये संजय देशमुख (यवतमाळ), संजय जाधव (परभणी), संजय दिना पाटील (मुंबई ईशान्य), नागेश पाटील-आष्टीकर (हिंगोली), ओमप्रकाश राजेनिंबाळकर (धाराशिव) आणि भाऊसाहेब वाकचौरे (शिर्डी) या खासदारांचा समावेश होता. या विलीनीकरणामुळे लोकसभेत ठाकरे गटाचे संख्याबळ घसरून ३ वर आले आहे, तर शिंदे गटाच्या खासदारांची संख्या ७ वरून थेट १३ वर पोहोचली आहे. लोकसभा अध्यक्षांच्या या निर्णयाविरोधात ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

ठाकरे गटाची बाजू मांडताना वरिष्ठ वकील देवदत्त कामत यांनी न्यायालयात दावा केला की, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे कोणतीही अपात्रता याचिका प्रलंबित नसताना विलीनीकरणाला मान्यता देणारा आदेश पारित करण्याचा कोणताही संबंध उद्भवत नव्हता. त्यांनी अध्यक्षांच्या या निर्णयाला तात्काळ अंतरिम स्थगिती देण्याची आग्रही मागणी केली. तसेच, हे विलीनीकरण पत्र लोकसभा अध्यक्षांऐवजी एका संयुक्त सचिवांच्या सहीने जारी करण्यात आल्याचा मुद्दाही त्यांनी न्यायालयात उपस्थित केला.

### हा तर संसदीय लोकशाहीच्या आत्म्याला धक्का : ॲड. कामत

ॲड. देवदत्त कामत युक्तिवाद करताना म्हणाले, हा प्रकार घटनात्मक नैतिकतेवर आणि औचित्यावर मोठे प्रश्न उपस्थित करतो, जो थेट संसदीय लोकशाहीच्या आत्म्याला धक्का पोहोचवणारा आहे. आमच्या पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या ९ पैकी ६ खासदारांबाबत कोणतीही अपात्रता याचिका प्रलंबित नव्हती. सर्वोच्च न्यायालयाने 'सुभाष देसाई' प्रकरणात दिलेल्या निर्णयानुसार विलीनीकरणाचा प्रश्नच निर्माण होत नाही. केवळ संसदेच्या अधिवेशनाचे औचित्य साधून ही संपूर्ण रणनीती आखण्यात आली आहे. त्यामुळे न्यायालयाने या प्रकरणावर पुढील आठवड्यात सुनावणी घ्यावी. दुसऱ्या बाजूने, एकनाथ शिंदे गटातर्फे वरिष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी उपस्थित राहून ठाकरे गटाच्या या याचिकेला तीव्र विरोध दर्शवला.

दोन्ही बाजूंचा प्राथमिक युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने लोकसभा अध्यक्षांना नोटीस जारी केली, मात्र विलीनीकरणाला तात्काळ अंतरिम स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला. खंडपीठाने लोकसभा अध्यक्षांच्या सचिवालयाला नोटीस जारी केली असून या संपूर्ण प्रकरणावर स्पष्टीकरण व उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता दोन आठवड्यांनंतर होणार आहे.




॥ दशक्रिया विधी ॥

तुमच्या प्रेमाचा स्पर्श हृदयात सदैव राहील,
तुमच्या आठवणींचा दीप कायम तेवत राहील.
ईश्वर चरणी लाभो चिरशांतीचा धाम,
भावपूर्ण श्रद्धांजली, सदैव राहील तुमचे नाम.

कै. शंकर रामा इधाते

यांना दि. १५/०७/२०२६ रोजी देवाज्ञा झाली असून त्यांचा

॥ दशक्रियाविधी ॥

शुक्रवार दि. २४/०७/२०२६ रोजी सकाळी ७:०० वाजता होईल.

ठिकाण - हंगानदी तीरी, हंगेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर

* दुःखांकित *

श्रीमती. गिरजाबाई शंकर इधाते (पत्नी)

श्री. राजेंद्र शंकर इधाते (मुलगा)
श्री. भगवान शंकर इधाते (मुलगा)
चि. ओम राजेंद्र इधाते (नातू)
श्री. सचिन दत्तात्रय इधाते (नातू)
श्री. हरिभाऊ दत्तात्रय इधाते (नातू)

श्रीमती शांताबाई निवृत्ती इधाते (भाऊजई)
श्री. दत्तात्रय निवृत्ती इधाते (पुतण्या)
श्री. बापू निवृत्ती इधाते (पुतण्या)
श्री. वसंत निवृत्ती इधाते (पुतण्या)
सौ. इंदू रमेश भोंगळे (नात)

समस्त इधाते परिवार

टिप : ह. भ. प. श्री. सोमनाथ महाराज बारगळ यांचे प्रवचन होईल.

# SPOT NEWS

## अमृतवाहिनी आयटीआयच्या १०७ विद्यार्थ्यांची बजाज ऑटोमध्ये निवड

**● संगमनेर । वीरभूमी –**

अमृतवाहिनी आयटीआय, अमृतनगर, संगमनेर येथे १४ जुलै २०२६ रोजी बजाज ऑटो लि., पुणे या नामांकित कंपनीचा कॅम्पस इंटरव्ह्यू उत्साहात पार पडला. कंपनीचे एचआर मॅनेजर श्री. गणेश जाधव व प्रोडक्शन मॅनेजर श्री. तान्हाजी पाटील यांनी अंतिम वर्षातील मेकॅनिक मोटर व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, फिटर, इलेक्ट्रिशियन, वायरमन तसेच कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेडच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यापैकी एकूण १०७ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. या प्रक्रियेसाठी टाटा स्ट्राइव्हच्या प्रोजेक्ट कॉर्डिनेटर सौ. सरस्वती शिंदे यांनी सहकार्य केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण मिळावे या उद्देशाने सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी १९८४ मध्ये अमृतवाहिनी आयटीआयची स्थापना केली. सातत्यपूर्ण गुणवत्ता, शिस्तबद्ध व स्वच्छ परिसर, आधुनिक सुविधा, उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण आणि प्रभावी प्लेसमेंट व्यवस्थेमुळे संस्थेतील विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये सातत्याने निवड होत आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीरजी तांबे, विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर अकॅडेमिक डॉ. जे. बी. गुरव, आयटीआयचे प्राचार्य व्ही. व्ही. भाटे तसेच नामदेव गायकवाड यांनी अभिनंदन केले. कॅम्पस इंटरव्ह्यू यशस्वी करण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागासह सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जिल्ह्यात ४ ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सण, उत्सव, विविध कार्यक्रम, मंत्रीमहोदय व इतर अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे तसेच जातीय संवेदनशील वातावरणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा महसूल हद्दीत २२ जुलै ते ४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी सुभाष दळवी यांनी हा प्रतिबंधात्मक आदेश पारित केला आहे. या आदेशानुसार शस्त्रे, काठ्या, सोटे, तलवारी, भाले, सुरे, बंदुका तसेच शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच दगड, क्षेपणास्त्रे किंवा ती फेकण्यासाठी वापरावयाची साधने जवळ बाळगणे, तयार करणे अथवा जमा करणे, कोणत्याही व्यक्तींच्या आकृत्या किंवा प्रतिमांचे प्रदर्शन करणे तसेच दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगणे अथवा तयार करणे यावरही बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय जाहीरपणे घोषणा देणे, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे, ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक तसेच मानवी आवाजाचे वर्धन करणारी अथवा तो जसा आहे तसा ऐकविणारी उपकरणे वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. सभ्यता किंवा नीतिमत्तेला धक्का पोहोचेल अथवा सार्वजनिक शांतता धोक्यात येईल असे कृत्य करणे, आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे, सोंग आणणे तसेच चित्रे, चिन्हे किंवा इतर वस्तू तयार करणे अथवा त्यांचा प्रचार करणे यालाही प्रतिबंध करण्यात आला आहे. सार्वजनिक अथवा खाजगी ठिकाणी सभा घेणे, मिरवणुका काढणे, रस्ता रोको करणे तसेच पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. शासकीय सेवेतील कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक असलेल्या व्यक्ती तसेच शारीरिक दुर्बलतेमुळे लाठी किंवा काठी वापरणाऱ्या व्यक्तींना हे आदेश लागू राहणार नाहीत. तसेच अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, धार्मिक मिरवणुका, लग्नसमारंभ व लग्नाच्या मिरवणुकांना या आदेशातून वगळण्यात आले आहे. संबंधित प्रभारी पोलीस निरीक्षक अथवा सहाय्यक पोलीस निरीक्षक यांची रीतसर परवानगी घेतलेल्या सभा व मिरवणुकांनाही या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

# पुणतांबा येथील श्री कार्तिक स्वामी मंदिरातील शिलालेख

### अठराव्या शतकातील धार्मिक व सांस्कृतिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज

**■ विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील पुणतांबा हे गोदावरी नदीकाठावरील प्राचीन धार्मिक क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. या गावातील त्र्यंबकेश्वर महादेव मंदिरालगत असलेल्या श्री कार्तिक स्वामी मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावरील गणेशपट्टीखाली हा महत्त्वपूर्ण शिलालेख कोरलेला आहे.


शिलालेखाची शिळा सुमारे २.५ फूट लांब व १.५ फूट रुंद असून त्यावरील अक्षरांची उंची सुमारे ३ सें.मी. आहे. हा दहा ओळींचा कोरीव शिलालेख असून तो देवनागरी लिपीतील मराठी-संस्कृत मिश्र भाषेत लिहिलेला आहे. शिलालेख आजही उत्तम स्थितीत असून अक्षरांची खोदाई स्पष्ट आणि उठावदार दिसून येते. वातावरणाचा कोणताही विशेष परिणाम या लेखावर झालेला नाही. मात्र, नंतर करण्यात आलेल्या रंगरंगोटीमुळे शेवटील ओळीचा काही भाग बाधित होऊ लागला आहे. लेखाच्या प्रारंभी आणि शेवटी दोन उभे दंड कोरलेले असून, थोड्या प्रयत्नाने संपूर्ण लेख सहज वाचता येतो.

शिलालेखाचे वाचन : १. श्री गणेशायनम:सके १६९४ नंदननाम सवत्सरे वैशाख श्रुद्ध २ सोमवा२. र रोहिणी नक्षत्र तद्दिवसि इदं अमृतेश्वर स्थापन श्रीअमृतेश्वरादार३. स्य ब्रह्मेश्वरपर्यंतं घटि सहितं श्रीगणपतिसहितं तथा श्रीसोमेश्व४. रसहितं श्रीगंगायां रामेश्वर स्थापन हनमत्सहितं तथा श्रीका ५. सी विश्वेश्वरं स्थापनं श्रीलक्ष्मीनारायणसहितं तथा गरूडस६. हितं तथा श्रीवृंदावन पंचायतन सहित तथा श्री वृक्षा रोपणइ७. दं संवें पुण्यस्तंभवासिपंतीत्कप नामक गोपालपंतस्य प्रपौ ८. त्रेण नरहरिपंतस्य पौत्रेण हरिपंतस्य पुत्रेण लक्ष्मवात्मजेन आं९. बादासपंत तदिहितेनकृंत श्रीरस्तु मात्रक त्यापरामस्का ।।१।।१०. है देवालय के सीत्पलास्का कंनयायद तथा सवास......

शिलालेखाचा अर्थ : शिलालेखाची सुरुवात श्री गणेशाय नमः या मंगलाचरणाने होते. पुढे शालिवाहन शक १६९४, नंदन नाम संवत्सर, वैशाख शुद्ध द्वितीया, सोमवार, रोहिणी नक्षत्र (दि. ४ मे १७७२) या शुभ तिथीची स्पष्ट नोंद आहे.

या दिवशी पुण्यस्तंभ (आजचे पुणतांबा) येथे वास्तव्यास असलेल्या गोपाळपंत यांच्या वंशातील गोपाळपंतांचे पणतू, नरहरिपंतांचे नातू, हरिपंतांचे पुत्र आणि लक्ष्मण यांचे सुपुत्र अंबादासपंत यांनी श्री अमृतेश्वर मंदिराची स्थापना केली. त्याचबरोबर ब्रह्मेश्वरापर्यंत घाटाची उभारणी करण्यात आली. तसेच श्री गणपती, श्री सोमेश्वर, श्री रामेश्वर, हनुमान, श्री काशी विश्वेश्वर, श्री लक्ष्मीनारायण, गरुड आणि पंचायतन देवतांची प्रतिष्ठापना करण्यात आल्याची नोंद आहे.

विशेष म्हणजे या शिलालेखात वृक्षारोपण हे धार्मिक पुण्यकर्म म्हणून नोंदविले गेले आहे. त्यामुळे मंदिर परिसरात वृक्षलागवड करण्याची परंपरा त्या काळी धार्मिक कार्याचा अविभाज्य भाग होती, हे स्पष्ट होते.



हा शिलालेख अठराव्या शतकातील महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा अत्यंत महत्त्वपूर्ण प्राथमिक पुरावा आहे. यामध्ये दिलेली शालिवाहन शक १६९४ (दि. ४ मे १७७२) ही अचूक कालनोंद मंदिराच्या स्थापनेचा निश्चित काळ सांगते.

या लेखातून केवळ श्री अमृतेश्वर मंदिराच्या स्थापनेची माहिती मिळत नाही, तर त्याचबरोबर घाटबांधणी, विविध देवतांच्या प्रतिष्ठापना आणि मंदिर संकुलाच्या नियोजनाचीही माहिती उपलब्ध होते. यावरून तत्कालीन देवस्थान विकासाची व्यापक संकल्पना स्पष्ट होते.

शिलालेखात नोंदविलेल्या वृक्षारोपणाच्या उल्लेखामुळे पर्यावरण संवर्धनाला धार्मिक अधिष्ठान असल्याचे सिद्ध होते. देवस्थान परिसर हिरवागार ठेवण्याची परंपरा आणि वृक्षसंवर्धन हे पुण्यकर्म मानले जात असल्याचा हा दुर्मीळ पुरावा आहे.

या लेखात गोपाळपंत, नरहरिपंत, हरिपंत, लक्ष्मण आणि अंबादासपंत यांची वंशावळ दिलेली असल्याने तत्कालीन विद्वान ब्राह्मण घराण्यांची सामाजिक भूमिका, धार्मिक कार्यातील त्यांचा सहभाग आणि स्थानिक नेतृत्व यांचा अभ्यास करण्यासाठी हा शिलालेख महत्त्वाचा ठरतो.

तसेच अमृतेश्वर, ब्रह्मेश्वर, सोमेश्वर, रामेश्वर, काशी विश्वेश्वर, गणपती, लक्ष्मीनारायण, गरुड, हनुमान आणि पंचायतन या विविध देवतांचा उल्लेख आढळत असल्यामुळे शैव, वैष्णव, गणपत्य आणि पंचायतन या विविध धार्मिक परंपरांचा सुंदर समन्वय तत्कालीन समाजजीवनात अस्तित्वात होता, हेही या लेखातून अधोरेखित होते.

या शिलालेखाचे वाचन, संशोधन, संकलन व माहिती पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे तर त्यांना ऋतिक लाहोटी, संतोष चंदने, करण सोनी यांनी सहकार्य केले आहे.

## आषाढी वारीनिमित्त येसगावातील ४० महिला भाविकांना कोल्हे यांच्या पुढाकारातून पंढरपूर दर्शन

**● कोपरगाव । वीरभूमी–**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त येसगाव येथील ४० महिला भाविकांना आरामबसद्वारे पंढरपूर वारीसाठी रवाना करण्यात आले. संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट श्री अमित कोल्हे व संजीवनी ग्रुप ऑफ स्कूल्सच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांच्या पुढाकारातून हा भक्तिमय उपक्रम आयोजित करण्यात आला. वारीसाठी रवाना होण्यापूर्वी कोल्हे दांपत्याने सर्व महिला भाविकांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच सुखरूप व मंगलमय वारीसाठी प्रार्थना केली.



यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना डॉ. मनाली कोल्हे म्हणाल्या की, येसगावला समृद्ध धार्मिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेचा वारसा लाभला आहे. महाराष्ट्राचे माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांचे जन्मगाव म्हणून येसगावची स्वतंत्र ओळख आहे. गावाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांच्या जतनासाठी त्यांनी नेहमीच योगदान दिले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी गावातील ग्रामस्थ समर्थपणे पार पाडत आहेत. या पवित्र आषाढी वारीसाठी महिला भाविकांना निरोप देताना कोल्हे परिवाराला विशेष आनंद होत आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, आषाढी वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून श्रद्धा, समता, सेवा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारी महान परंपरा आहे. या वारीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक भाविकाला अध्यात्मिक ऊर्जा मिळते. महिलांना या पवित्र सोहळ्यात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देणे, ही समाजाप्रती आपली बांधिलकी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या उपक्रमामुळे महिला भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांनी कोल्हे दांपत्याचे आभार मानत, अशा सामाजिक व धार्मिक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली.

येसगावातून विठ्ठलाच्या नामघोषात आणि भक्तिमय वातावरणात आरामबस पंढरपूरकडे रवाना झाली. या प्रसंगी ग्रामस्थ, महिला भाविक आणि कोल्हे परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हंगा विहिरीवरील ३०० मीटर वीज केबलची चोरी; पारनेरच्या पाणीपुरवठ्यावर संकट

### नगरपंचायतीचे २० हजारांचे नुकसान । अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या हंगा येथील नगरपंचायतीच्या विहिरीवरील विद्युत मोटारींना जोडलेली सुमारे ३०० मीटर लांबीची वीज केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमुळे नगरपंचायतीचे सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान झाले असून, शहराच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याप्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगरपंचायतीच्या विद्युत विभागातील लिपिक मारुती तुकाराम ठोंबरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, हंगा येथे पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी नगरपंचायतीच्या दोन विहिरी आहेत. तलावातील विहिरीवर ५ एच.पी. व १० एच.पी. क्षमतेच्या विद्युत मोटारी बसविण्यात आल्या आहेत.

१८ जुलै रोजी सकाळी कर्मचारी भरत ताराचंद नगरे हे नेहमीप्रमाणे मोटार सुरू करण्यासाठी गेले असता ती सुरू झाली नाही. पाहणी केली असता मोटारींना विद्युत पुरवठा करणारी सुमारे ३०० मीटर लांबीची केबल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. सुरुवातीला त्यांनी कार्यालयाला याची माहिती दिली नव्हती. मात्र, २० जुलै रोजी त्यांनी नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांना चोरीची माहिती दिली.

यानंतर मुख्याधिकारी व नगरपंचायतीचे अधिकारी-कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. प्रत्यक्ष पाहणीत दोन्ही मोटारींना जोडलेल्या केबली चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. आर्थिक फायद्याच्या उद्देशाने नगरपंचायतीच्या मालकीची केबल चोरून नेल्याचे निष्पन्न झाले.

या चोरीमध्ये अंदाजे २० हजार रुपये किमतीची सुमारे ३०० मीटर लांबीची विद्युत केबल लंपास करण्यात आली आहे. याप्रकरणी मारुती ठोंबरे यांच्या फिर्यादीवरून पारनेर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

दरम्यान, पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित यंत्रणांवर वारंवार चोरीच्या घटना घडत असल्याने अशा ठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे आणि नियमित पोलिस गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या घटनांमुळे केवळ नगरपंचायतीचे आर्थिक नुकसान होत नसून, शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेलाही फटका बसत असल्याने तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## जामखेड बाजार समितीय शेतकऱ्यांसाठी उभारलेले

# शेतकरी भवन ठरणार हक्काचे निवासस्थान

### प्रा. राम शिंदे । राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवनाचे लोकार्पण संपन्न

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शेतकरी माल विक्रीसाठी बाजार समितीत आल्यानंतर त्यांना सुरक्षित, सुसज्ज आणि सर्व सुविधा उपलब्ध असलेले निवासस्थान मिळावे, या उद्देशाने उभारण्यात आलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन हे शेतकऱ्यांसाठी हक्काचे निवासस्थान ठरेल. शेतकऱ्यांच्या सुविधांसाठी दर्जेदार पायाभूत सुविधा उभारण्यास राज्य शासन सर्वोच्च प्राधान्य देत असून अशा लोकाभिमुख विकासकामांना शासनाकडून भविष्यातही आवश्यक सहकार्य दिले जाईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.



जामखेड येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड येथे आयोजित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवनाच्या लोकार्पण सोहळ्यासह कृषी उत्पन्न बाजार समिती, जामखेड कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी आयोजित एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा.राम शिंदे बोलत होते.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शरद कार्ले, उपसभापती नंदकुमार गोरे, पणन संचालक शरद जरे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे,

सहाय्यक निबंधक तथा बाजार समिती सचिव दिलीप तिजोरे यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य, विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. राम शिंदे म्हणाले की, राज्य शासनाने शेतकरी भवनास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर अल्पावधीतच दर्जेदार व भव्य इमारत उभारून अनेक वर्षांपासूनची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण केली आहे. या कामाची गुणवत्ता आणि नियोजन कौतुकास्पद आहे. शेतकरी माल विक्रीसाठी बाजार समितीत आल्यानंतर मुक्कामासाठी सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने उभारण्यात आलेल्या भवनामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून बाजार समित्यांनी केवळ व्यापारापुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या सर्वांगीण सुविधांवर भर द्यावा, असेही ते म्हणाले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचे ध्येय समोर ठेवले असून महाराष्ट्राने विकासाच्या या प्रवासात अग्रणी भूमिका बजावावी. शासन, लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि नागरिक यांच्या समन्वयातून शासनाच्या सर्व योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. याच उद्देशाने राज्यभर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियान राबविण्यात येत असून कर्जत तालुक्यातही त्याचे प्रभावी आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासन सातत्याने कार्यरत असून हरभरा, उडीद, मका आणि कांदा या पिकांची नाफेड व संबंधित यंत्रणांमार्फत किमान आधारभूत किंमतीने (एमएसपी) खरेदी सुरू आहे. बाजारभाव घसरल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी शासन प्रभावी उपाययोजना राबवत असल्याचेही ते म्हणाले.

### बायरकडून भारतात अल्पभूधारक शेतकऱ्यांना

## अत्याधुनिक कीड व्यवस्थापनाद्वारे मदत करण्यासाठी 'ट्रान्स' सादर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

बायरने 'ट्रान्स' या नावीन्यपूर्ण कीटकनाशकाची बाजारातील प्रवेशाची घोषणा केली. हे कीटकनाशक कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मावा, तुडतुडे आणि पांढरी माशी अशा रस शोषणाऱ्या कीट समूहांचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यास उपयुक्त ठरेल. एकाच उत्पादा मध्ये दोन प्रभावी कार्यपद्धती एकत्र करून 'ट्रान्स' व्यापक नियंत्रण देते, ज्यामुळे पिकांचे आरोग्य सुधारते आणि पिकाची उत्पादकता व शेतकऱ्यांचा नफा वाढतो. हे उत्पादन जुलै २०२६ पासून महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, तामिळनाडू, राजस्थान, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, पंजाब आणि हरियाणा अशा प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमध्ये उपलब्ध होईल.




भारतातील कापूस लागवडीला एकाच वेळी अनेक रस शोषणाऱ्या किडींना सामोरे जावे लागते. कीटकामध्ये वाढणारी प्रतिकारशक्ती, अनेक प्रकारच्या कीटकांचा एकाच वेळी प्रादुर्भाव आणि कीट व्यवस्थापनासाठी मर्यादित उपायांमुळे पिकाला सतत वाढत्या दबावाला सामोरे जावे लागत आहे. या आव्हानांमुळे अनेकदा पिकांची वाढ खुंटते, उत्पन्न कमी होते आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढतो.

या बदलत्या गरजा लक्षात घेऊन विकसित केलेले 'ट्रान्स' दोन प्रगत रसायनांना एकत्र आणते ज्यांची कार्यपद्धती एकमेकांना पूरक आहे. आधुनिक शेतीसाठी तयार केलेले ट्रान्स हे पिकामध्ये दुहेरी मार्ग प्रणाली आणि पर्णपटल-पार क्रियेने काम करते. ज्यामुळे विद्यमान पाने आणि नवीन येणारी पाने या दोन्हींचे संरक्षण शक्य होते. याचे पर्जन्य-प्रतिरोधक सूत्र, फवारणीनंतर दोन तासांनंतर होणाऱ्या पाऊसमूळे याच्या असरकारकते मध्ये काही बाधा आणत नाही. याच बरोबर एकात्मिक कीड व्यवस्थापन कार्यक्रमांमध्ये 'ट्रान्स' सहजपणे सामावू शकते ज्यामुळे अधिक शाश्वत पीक संरक्षण पद्धती शक्य होते.

प्रभावी कीड नियंत्रणापलीकडे जाऊन 'ट्रान्स' पिकाच्या निरोगी वाढीद्वारे पिकाचे आरोग्य जपण्यास मदत करते. हे कीटकांचे जलद अन्नग्रहण थांबवून, पाने अधिक स्वस्थ करते आणि वारंवार पीक संरक्षणाचा हस्तक्षेप कमी करून गुंतवणुकीवरील परतावा व उत्पादन क्षमताही सुधारते.

या उत्पादनाबाबत बोलताना बायरच्या क्रॉप सायन्स विभागाचे, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर (सी.ओ.ओ.) मोहन बाबू म्हणाले, बायरमध्ये शेतकऱ्यांच्या बदलत्या आव्हानांना समजून घेऊन नवीन उत्पाद निर्मितीची सुरुवात होते. अनेक कीटकांचा एकत्र प्रादुर्भाव आणि वाढती प्रतिरोधक क्षमता यामुळे रस शोषणाऱ्या कीड समूहांचे व्यवस्थापन करणे अधिकाधिक कठीण झाले आहे. ट्रान्स दोन पूरक कार्यपद्धतींना एकाच नाविन्यपूर्ण उपायात एकत्र आणते. त्यातून प्रभावी आणि शाश्वत कीड व्यवस्थापन मिळते आणि शेतकऱ्यांना पिकाचे आरोग्य, उत्पादकता आणि नफा सुधारण्यास मदत करते.

ट्रान्स बाजारात उपलब्ध करताना बायर आपले पीक संरक्षण उत्पाद संग्रह अधिक मजबूत करत आहे. कंपनी विज्ञानावर आधारित नवनिर्मिती सादर करत असून त्यातून शेतकऱ्यांना संसाधनांचे जतन करण्यासाठी आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठीच्या आपल्या प्रयत्नांमध्ये पुढचे पाऊल टाकत आहे. ट्रान्स १०० मिली, २२० मिली आणि ५०० मिली पॅकमध्ये उपलब्ध असेल.

वीरभूमी

हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.

* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## कोपरगावात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने स्व. अजितदादा पवार यांना अभिवादन

**• कोपरगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री, लोकनेते स्व. अजितदादा पवार साहेब यांच्या स्मृतींना कोपरगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला आदरांजली वाहण्यात आली. आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या अभिवादन कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्याच्या विकासासाठी स्व. अजितदादा पवार यांनी दिलेले योगदान, प्रशासनातील त्यांची कार्यशैली आणि जनतेशी असलेली बांधिलकी यांचा उपस्थितांनी गौरव केला. त्यांच्या विचारांना पुढे नेण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. यावेळी माजी नगराध्यक्ष पद्माकांत कुदळे, समता उद्योग समुहाचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, नगरसेवक गटनेत्या सौ.गौरी पहाडे, सौ.निर्मलाआढाव, सौ. सोनम त्रिभुवन, राजेंद्र वाकचौरे, इम्तियाज अत्तार, संदिप कपिले, राहुल शिरसाठ, शैलेश साबळे, वाल्मिक लहिरे, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक विरेन बोरावके, मंदार पहाडे, बाळासाहेब आढाव, संदिप पगारे, फकीर कुरेशी, दिनकर खरे, सौ.मायादेवी खरे, विजय त्रिभुवन, सोमनाथ आढाव, शुभम काळे, चंद्रकांत धोत्रे, राजेंद्र खैरनार, मनोज नरोडे, अरुण त्रिभुवन, सुनिल फंड, सौ. वैशाली आभाळे, सौ. निता साबळे, विजय बंब, राहुल सोनवणे, सुनिल मोकळ, सचिन परदेशी, जावेद शेख, राजेंद्र उशिरे, अंबादास वडांगळे, गणेश गोसावी, सिद्धार्थ शेळके, हारूण शेख, प्रदीप कुऱ्हाडे, वैभव कानडे, दादा नाईकवाडे, राजेंद्र आभाळे, प्रशांत मोरे, विजय दाभाडे, मयूर राऊत, अजय लोखंडे, तन्मय साबळे, विकी चांदर, हर्षल जैस्वाल, एकनाथ गंगुले, संजय दुशिंग, विनायक सपकाळ, अमोल देवकर, ओम आढाव, सचिन बागले, योगेश वाणी आदी उपस्थित होते.

## अहिल्यानगरमध्ये २४ जुलै रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**• अहिल्यानगर । वीरभूमी–**

नॅशनल करिअर सर्व्हिस (एनसीएस) पोर्टलच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त अहिल्यानगर येथे दि. २४ जुलै रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात पाच आस्थापनांकडून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उमेदवारांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार असून, नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे प्रभारी सहाय्यक आयुक्त योगेश उगले यांनी केले आहे. केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयांतर्गत कार्यरत नॅशनल करिअर सर्व्हिस (एनसीएस) पोर्टलच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त दि. २० ते २४ जुलै या कालावधीत 'एनसीएस पोर्टल लॉंच वीक' साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, टी. व्ही. सेंटर, अहिल्यानगर येथे दि. २४ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात एच. एस. सोल्युशन प्रा. लि., साई इन्फोटेक, संत नागेबाबा मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी, जनराली सेंट्रल लाईफ इन्शुरन्स आणि मुथूट होम फायनान्स ही पाच आस्थापने सहभागी होणार आहेत. एचएससी, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अशा विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड करून नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. नोकरी इच्छुक उमेदवारांनी सेवायोजन नोंदणी केली नसल्यास www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. त्यानंतर लॉग-इन करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्त पदांसाठी अर्ज करावा. तसेच www.ncs.gov.in या संकेतस्थळावरही सहभाग नोंदवून प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी प्लेसमेंट ड्राईव्ह समन्वयक वसीमखान पठाण (मो. ९४०९५५५४६५) यांच्याशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी सहभाग नोंदवून या रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निराधार ज्येष्ठांना छत्री वाटप, मिष्टान्न भोजन व रक्तदान शिबिर

**• अहिल्यानगर । वीरभूमी–**

भिंगार येथे राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांना अनोखी आदरांजली वाहण्यात आली. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रोकडेश्वर हनुमान मंदिर परिसरात निराधार ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर त्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. याचबरोबर आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. आमदार संग्राम जगताप व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ, मीडिया सेलचे शहराध्यक्ष मारुती पवार, राष्ट्रवादी युवक काँग्रेस भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी, दीपक लिपाने, संपत बेरड, सिद्धार्थ आढाव, प्रशांत डावरे, सुदाम गांधले, विलास तोडमल, अक्षय नागापुरे, राजू जंगम, दिनेश लंगोटे आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात

# रेनवडी गावाची विभागीय स्तरावर झेप

### जिल्ह्यातील अव्वल दोन ग्रामपंचायतींमध्ये स्थान । लोकसहभाग, सुशासन व विकासकामांची दखल

**• पारनेर । वीरभूमी –**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६' अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील रेनवडी ग्रामपंचायतीने उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्यातील अव्वल दोन ग्रामपंचायतींमध्ये स्थान मिळविले आहे. या यशामुळे रेनवडी ग्रामपंचायत आता थेट विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे.



मागील महिन्यात सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त विशेष मूल्यमापन समितीने जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायतींची प्रत्यक्ष पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला. यामध्ये सुशासन, सक्षम ग्रामपंचायत, स्वच्छ व हरित गाव, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अभिसरण, उपजीविका व विकास, संस्थात्मक सक्षमीकरण, श्रमदान, लोकसहभाग तसेच विविध नाविन्यपूर्ण उपक्रम अशा निकषांवर मूल्यांकन करण्यात आले. या सर्व बाबींमध्ये रेनवडी ग्रामपंचायतीने उत्कृष्ट कामगिरी करत उल्लेखनीय गुण मिळवले.

प्रशासकीय पारदर्शकता, लोकसहभाग, पर्यावरण संवर्धन, ग्रामस्वच्छता, महिला बचत गटांचे सक्षमीकरण, युवकांचा सक्रिय सहभाग आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांमुळे रेनवडीची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

आता पुढील टप्प्यात विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली उच्चस्तरीय समितीकडून ग्रामपंचायतीच्या कामाचे पुनर्मूल्यांकन करण्यात येणार आहे. या समितीत अप्पर आयुक्त (विकास) वर्षा गौरकर, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूरचे प्राचार्य गिरीश धायगुडे, उपायुक्त (विकास) उमेश निकम तसेच अमोल महल्ले, राजू परसवार आणि प्रणव बक्षी यांचा समावेश आहे. या पाहणीच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने तयारी सुरू केली आहे.

जिल्हास्तरावरील या यशामुळे रेनवडी ग्रामपंचायत, ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, विविध विकास समित्या, महिला बचत गट, युवक मंडळे तसेच गावातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जिल्ह्यातील यशानंतर विभागीय स्तरावरही रेनवडी ग्रामपंचायत उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

### पाथर्डीत स्व. अजितदादा पवार यांची जयंती

## वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, विद्यार्थ्यांना साहित्य व खाऊ वाटप अशा उपक्रमांनी साजरी

**• पाथर्डी । वीरभूमी –**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांची जयंती पाथर्डी तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

पाथर्डी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने शहरातील स्व. वसंतराव नाईक चौक येथे सार्वजनिक आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी श्रद्धांजली वाहत त्यांच्या कार्याचा गौरव केला.



या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. अंकुश गर्जे, ज्येष्ठ नेते भीमराव फुंदे, तालुकाध्यक्ष रणजीत बेळगे, महिला तालुकाध्यक्ष मनीषा डांभे, शहराध्यक्ष धन्यकुमार गुगळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जगदीश गाडे, बौद्धाचार्य वसंत बोर्डे, दिगंबर गाडे, हुमायून भाई आतार, आकाश काळोखे, माजी नगरसेवक रमेश गोरे, रवींद्र म्हस्के, चांद मणियार, राहुल ढाकणे, नानासाहेब पडळकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

जयंतीनिमित्त तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना खाऊ व शालेय साहित्य वाटप, आरोग्य तपासणी शिबिर, वृक्षारोपण, सामान्य ज्ञान स्पर्धा तसेच चित्रकला स्पर्धा अशा विविध उपक्रमांमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

याशिवाय तालुक्यातील विविध शासकीय कार्यालये, शाळा आणि शैक्षणिक संस्थांमध्येही स्व. अजितदादा पवार यांची जयंती विविध कार्यक्रमांद्वारे साजरी करण्यात आली.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**• श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथे राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा लोकनेते अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



यावेळी बोलताना राजेंद्रदादा नागवडे भावूक झाले. नागवडे आणि पवार कुटुंबांमधील पिढ्यानपिढ्यांचे जिव्हाळ्याचे संबंध अधोरेखित करत त्यांनी अजितदादा पवार हे केवळ राजकीय नेते नसून प्रशासनावर मजबूत पकड असलेले, शेतकऱ्यांच्या सुख-दुःखाशी घट्ट नाते जोडणारे लोकनेते होते, असे सांगितले. सहकार क्षेत्र, ग्रामीण विकास आणि कार्यकर्त्यांवरील प्रेम यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या जाण्याने सहकार व राजकीय क्षेत्राची कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली असून, त्यांचे विचार पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात अजितदादा पवार यांच्या पर्यावरणप्रेमाचा उल्लेख करत त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ महाविद्यालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याने एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आल्याची माहिती दिली. वृक्षारोपण हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून पर्यावरण संवर्धनाचा हरित संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष संदीप औटी, संचालक श्रीनिवास घाडगे, विश्वनाथ गिरमकर, विठ्ठल जंगले, बंडोपंत जगताप, भाऊसाहेब नेटके, प्रा. सुरेश रसाळ, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य चंद्रभान कातोरे, पर्यवेक्षक प्रवीण टकले, वरिष्ठ महाविद्यालयातील विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

# सीईओ आनंद भंडारी यांची शिरसाटवाडी शाळेला अचानक भेट

### 'कुसुमाग्रज वाचनालय' उपक्रमावर नाराजी । 'मिशन आरंभ' प्रभावी राबविण्याच्या सूचना

**• पाथर्डी । वीरभूमी–**

जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिरसाटवाडी येथे अचानक भेट देत शाळेची सखोल पाहणी केली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून वाचन, पाढे पाठांतर तसेच 'मिशन आरंभ' अंतर्गत गणिताच्या गुणवत्तेची तपासणी केली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत ग्रामीण विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी लोकसहभाग वाढविण्याचे आवाहन केले. तसेच शाळा परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

पाहणीदरम्यान 'कुसुमाग्रज वाचनालय' उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. 'रीडिंग बेल' आणि सारांश लेखनाबाबत समाधानकारक माहिती न मिळाल्याने अधिकारी व मुख्याध्यापकांना जाब विचारत जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये वाचनालय उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी त्यांनी 'मिशन आरंभ' प्रभावीपणे राबविणे, पात्र विद्यार्थ्यांना नवोदय परीक्षेसाठी प्रोत्साहित करणे, विनोबा प व उल्हास पवरील काम वेळेत पूर्ण करणे, साक्षरता अभियानात सक्रिय सहभाग घेणे, परीक्षा कॉपीमुक्त घेणे, शाळा व परिसर स्वच्छ ठेवणे, पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणे तसेच पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी नियमित व वस्तुनिष्ठ तपासणी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.

गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले. केंद्रप्रमुख देवेंद्र अंबेटकर यांनी शाळास्तरावरील सर्व उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवून गुणवत्ता वृद्धीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.



यावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, गटविकास अधिकारी राजेंद्र धस, गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड, केंद्रप्रमुख देवेंद्र अंबेटकर, केंद्रप्रमुख विठ्ठल शिंदे, शिक्षक अभिजित भागवत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, शिक्षक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महसूल समाधान शिबिरातून लोकाभिमुख प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी : सभापती प्रा. राम शिंदे

**• अहिल्यानगर । वीरभूमी –**

प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी शासनाने डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांना वेळेत सेवा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले आहे. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि महसूल सेवा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यास राज्य शासन कटिबद्ध आहे. महसूल समाधान शिबिरातून लोकाभिमुख प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त कर्जत येथील शारदाबाई पवार सभागृह, दादा पाटील महाविद्यालय येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' शुभारंभ कार्यक्रमात प्रा. शिंदे बोलत होते.

यावेळी विधान परिषद सदस्य सुनील कर्जतकर, नगराध्यक्षा छायाताई शेलार, उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, तहसीलदार रवी सतवन, गट विकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. राम शिंदे म्हणाले, शासन हे सत्तेचे नव्हे तर सेवेचे माध्यम असून प्रत्येक प्रशासकीय अधिकारी हा शासनाच्या निर्णयांचा जनतेपर्यंत पोहोचविणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला वेळेत, पारदर्शक आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. 'शासन आपल्या दारी' उपक्रमामुळे शासनाच्या विविध सेवा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचत असून लोकाभिमुख प्रशासन अधिक प्रभावी होत असल्याचे ते म्हणाले.

महसूल विभागात राबविण्यात आलेल्या डिजिटल सुधारणांमुळे उत्पन्न, जात व अधिवास प्रमाणपत्रे अधिक वेगाने उपलब्ध होत आहेत. तहसीलदार अथवा उपविभागीय अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित नसतानाही डिजिटल प्रणालीद्वारे प्रमाणपत्रे निर्गमित करण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांचा वेळ व खर्चाची बचत होत आहे. ई-पीक पाहणी प्रणालीमुळे पीकस्थितीची अचूक माहिती उपलब्ध होत असून शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ अधिक जलद व पारदर्शक पद्धतीने मिळत आहे. विविध अनुदान व कर्जमाफी योजनांतील आर्थिक लाभ थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याने लाभ वितरणाची प्रक्रिया अधिक गतिमान व विश्वासार्ह झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे निश्चित कालावधीत निकाली काढण्यासाठी 'झिरो पेंडन्सी' अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. कालबाह्य जमीन कायद्यांमध्ये सुधारणा करून ते अधिक लोकाभिमुख करण्यात आले आहेत. पोटखराबा जमीन लागवडीयोग्य करण्याची मोहीम, शासकीय जमिनीवरील घरे नियमित करण्याची प्रक्रिया तसेच महिलांच्या वारसा हक्कांच्या संरक्षणासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे प्रा. शिंदे यांनी सांगितले.

सन २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टात महाराष्ट्राने नेतृत्व करावे, यासाठी शासन, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी समन्वयाने कार्य करून विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कर्जत-जामखेड मतदारसंघातील अनेक नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात मिळत असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

विधान परिषद सदस्य सुनील कर्जतकर म्हणाले की, राज्य शासन हे सर्वसामान्यांचे शासन असून नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे



राबविल्या जात असून कर्जत-जामखेड परिसरातील अधिकाधिक नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा. महसूल समाधान शिबिरामुळे नागरिकांच्या अनेक अडचणी जागेवरच निकाली निघत असून लोकाभिमुख प्रशासन अधिक बळकट होत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात उपविभागीय अधिकारी नितीन पाटील म्हणाले, शासनाच्या विविध योजनांच्या लाभांचे वितरण तसेच शासकीय योजनांविषयी जनजागृती करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या माध्यमातून विविध योजनांतील १९ हजार लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते विविध योजनांच्या लाभांचे वितरण करण्यात आले. तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# शेतकऱ्यांसाठी ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । प्रवरानगर येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' कार्यक्रमात विविध योजनांच्या लाभांचे वितरण

**● शिर्डी । वीरभूमी –**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सर्वसमावेशक विकासाला गती मिळाली असून प्रलंबित सिंचन प्रकल्प, पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, शेतकरी कल्याण आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती झाली आहे. शेतकऱ्यांसाठी ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान तसेच कृषी पंपांच्या थकीत वीजबिलांची माफी यांसारखे निर्णय राज्याच्या विकासाभिमुख धोरणाचे द्योतक असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त शिर्डी विधानसभा मतदारसंघातील प्रवरानगर येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, राहाता नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, शिर्डी नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, भूमी अभिलेख विभागाचे जिल्हा अधीक्षक संजय कुंभार, राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, स्वर्गीय अजित पवार यांनी जलसंपदा क्षेत्रात दूरदृष्टीचे निर्णय घेतले. विशेषतः निळवंडे धरणाच्या पुनर्वसनासाठी प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीऐवजी आर्थिक मोबदला देण्याच्या निर्णयामुळे पुनर्वसन प्रक्रिया गतिमान झाली. या निर्णयामुळे राज्यातील अनेक सिंचन प्रकल्प मार्गी लागण्यास मदत झाली असून त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील.

दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासन जलसंधारण व सिंचन प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात काम करीत असल्याचे सांगून त्यांनी गोदावरी खोऱ्यातील पाण्याचा प्रभावी वापर, धरणांची क्षमता वाढविणे, कालव्यांची दुरुस्ती, निळवंडे कालव्याचे काम, साखळी योजना तसेच विविध सिंचन प्रकल्पांना प्राधान्य दिले जात आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना शाश्वत पाणी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.

शासनाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्हा राज्यात आघाडीवर आहे. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत महिलांना प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. तसेच जिल्ह्यातील एकल महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत.

प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आणि विविध कृषी योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणावर दिला जात असल्याचे सांगून कृषी विभागाचे काम अधिक गतिमान करण्यासाठी कृषी सहाय्यकांना संगणक संच उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. गावांचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी पाणंद रस्ते, गावनकाशे आणि इतर मूलभूत सुविधांची कामे वेगाने पूर्ण करण्यात येत असून सार्वजनिक हिताच्या कामांमध्ये अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांवर नियमानुसार कारवाई करून शेतकऱ्यांना दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यास शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' हे शासनाच्या विविध योजना व सेवा नागरिकांपर्यंत एकाच ठिकाणी पोहोचविणारे महत्त्वपूर्ण अभियान आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, कामगार, वंचित घटक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून शेतकरी कर्जमुक्ती, ऊर्जा क्षेत्रातील सुविधा आणि विविध विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे. तसेच स्वर्गीय माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राज्याच्या विकासातील योगदानाला त्यांनी आदरांजली अर्पण केली.




जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान'चा उद्देश शासनाच्या विविध योजना व सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे हा असून पुढील काळात जिल्ह्यातील सर्व तालुके व मतदारसंघांमध्ये अशा स्वरूपाची शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. शेतरस्ते मोकळे करण्याची मोहीम, 'नक्षा' व 'स्वामित्व' योजनांची अंमलबजावणी, बदलत्या हवामानानुसार शेतीविषयक मार्गदर्शन, तसेच आयुष्मान भारत, वयोवंदना आणि लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी शासनाच्या महसूल व विकासविषयक विविध निर्णयांची माहिती दिली. अकृषिक परवानगीची अट रद्द करणे, निवासी अतिक्रमणे नियमित करणे, जमिनी वर्ग–एक करणे, 'मुख्यमंत्री बळीराजा शेतपांदण रस्ते योजना' तसेच शिर्डी औद्योगिक वसाहत, शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिर्डी विमानतळ आणि निळवंडे धरणाच्या पाण्यामुळे परिसराच्या विकासाला चालना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

# पारनेर तालुक्यात युरिया खताचा तीव्र तुटवडा, शेतकरी वर्गात चिंतेचे व संतापाचे वातावरण

**● पारनेर । वीरभूमी –**

सध्या खरीप हंगाम जोमात सुरू असतानाच पारनेर तालुक्यात युरिया खताचा गंभीर व तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे. ऐन पिकांच्या वाढीच्या काळात खत मिळत नसल्यामुळे तालुक्यातील बळीराजा हवालदिल झाला असून, कृषी केंद्रांसमोर शेतकऱ्यांना पहाटेपासूनच लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत. दिवसभर ताटकळत उभे राहूनही खत मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रशासनाबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे.



युरियाच्या या कृत्रिम किंवा वास्तविक टंचाईचा गैरफायदा काही अकार्यक्षम व नफेखोर कृषी केंद्रांकडून घेतला जात असल्याची चर्चा आहे. खतासोबत इतर अनावश्यक औषधे किंवा खते घेण्याची सक्ती (लिंकिंग) केली जात असून, काही ठिकाणी चढ्या दराने विक्री होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेला शेतकरी अधिकच नागवला जात आहे.या गंभीर समस्येची दखल घेत निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रवींद्र राजदेव यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांना तात्काळ एक सविस्तर निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, पिकांच्या या महत्त्वपूर्ण टप्प्यात युरियाची नितांत आवश्यकता आहे, परंतु प्रशासकीय नियोजनाच्या अभावामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. निवेदनाद्वारे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या, पारनेर तालुक्यासाठी तात्काळ अतिरिक्त युरिया खताचा कोटा मंजूर करून पुरवठा सुरळीत करावा.

कृषी केंद्रांवरील होणारी गर्दी टाळण्यासाठी सोसायट्या आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून युरियाचे न्याय्य वाटप करावे. चढ्या दराने खत विकणाऱ्या आणि निषिद्ध लिंकिंग करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी.

आंदोलनाचा इशारा

प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष न करता आगामी दोन ते तीन दिवसांत सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा निलेश लंके प्रतिष्ठान व पारनेर तालुक्यातील समस्त शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा सज्जड इशारा रवींद्र राजदेव यांनी दिला आहे.

खरीप हंगामातील पिके हातातोंडाशी आलेली असताना खताविना ती सुकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन व कृषी विभागाने तातडीने हस्तक्षेप करून युरियाचा पुरवठा पूर्ववत करावा आणि शेतकऱ्यांचा खरीप हंगाम वाचवावा, अशी आर्त हाक पारनेर तालुक्यातील हतबल शेतकरी देत आहेत.

# दुर्गाष्टमी निमित्त शंकर महाराज भक्ती मठात भक्तिभावाचा उत्सव

## देवदत्त केकाण यांनी सांगितला सद्गुरू कृपेचा अनुभव । माधव बाबांचा अध्यात्म व नामस्मरणाचा संदेश

**● पाथर्डी । वीरभूमी –**

दुर्गाष्टमीच्या पावन पर्वानिमित्त पाथर्डी येथील सद्गुरू श्री शंकर महाराज भक्ती मठात परमपूज्य माधव बाबा यांच्या आशीर्वादाने विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिभाव आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. पहाटे श्रींच्या मूर्तीचा जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर नाशिकचे अप्पर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांच्या परिवाराच्या हस्ते पाद्यपूजा व आरती झाली. दुपारी १२ वाजता महाआरती संपन्न झाली. त्यानंतर आयोजित महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी श्रद्धेने घेतला.

यावेळी देवदत्त केकाण यांनी आपल्या जीवनातील भावनिक अनुभव कथन केला. ते म्हणाले, गुरुच्या शब्दाचे तन, मन आणि धनाने पालन केले तर सद्गुरू विविध रूपांत आपल्या पाठीशी उभे राहतात. कोरोना काळात



माझी प्रकृती अत्यंत गंभीर झाली होती. डॉक्टरांनी केवळ एक तासाची आशा व्यक्त केली होती. मात्र माझ्या पत्नीने अखंड गुरुजप आणि नामस्मरण सुरू ठेवले. सद्गुरूंच्या कृपेने मला नवजीवन मिळाले. आज मी आपल्यासमोर उभा आहे, हे परमपूज्य माधव बाबा आणि सद्गुरू श्री शंकर महाराज यांच्या कृपेचेच फळ आहे. त्यांच्या या अनुभवाने उपस्थित भाविक भारावून गेले.

सद्गुरू श्री शंकर महाराज भक्ती मठाचे मठाधिपती परमपूजनीय माधव बाबा यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मानवाला जीवनात अनेक संकटांचा सामना करावा लागतो. परंतु परमार्थ, सत्कर्म, नामस्मरण आणि धार्मिक आचरण यामुळे संकटांवर मात करता येते. ईश्वरभक्ती आणि गुरुसेवेतच खरे समाधान आणि दुःखातून मुक्तीचा मार्ग दडलेला आहे. त्यांनी दुर्गाष्टमीच्या निमित्ताने सर्व भाविकांना आशीर्वाद देत आध्यात्मिक जीवनाचा संदेश दिला.

या धार्मिक सोहळ्यासाठी अहिल्यानगर, पुणे, मुंबई, नागपूर, अमरावतीसह राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने गुरुबंधू व भाविक उपस्थित होते.

# आषाढी वारीसाठी पारनेर आगारातून ३० विशेष एसटी बसेस; ४४ भाविक झाल्यास बस थेट गावात

**● पारनेर । वीरभूमी–**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी भाविकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पारनेर आगाराने विशेष जादा बससेवा सुरू केली आहे. मंगळवार (दि. २१ जुलै २०२६) पासून पारनेर आगारातून पंढरपूरसाठी तब्बल ३० विशेष बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील वारकरी, दिंड्या आणि भजनी मंडळींची गैरसोय टाळण्यासाठी यंदा विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एका गावातून किमान ४४ भाविक उपलब्ध झाल्यास एसटी बस थेट त्या गावात पाठवून पंढरपूरपर्यंत सेवा दिली जाणार आहे. त्यामुळे वारकऱ्यांना



बसस्थानकापर्यंत येण्याची गरज भासणार नाही.

वारकऱ्यांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी सर्व बसेसची तांत्रिक तपासणी पूर्ण करण्यात आली असून, प्रवाशांच्या सेवेसाठी सुसज्ज बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

पारनेर ते पंढरपूर प्रवासासाठी तिकीट दर पुढीलप्रमाणे आहेत : फुल तिकीट ४७० रुपये, हाफ तिकीट २३५ रुपये, तर अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत पात्र ज्येष्ठ नागरिकांसाठी तिकीट केवळ २ रुपये आहे. या विशेष बससेवेसाठी एसटी महामंडळाच्या सर्व शासकीय सवलती लागू राहणार आहेत.

राज्यभरातील वारकऱ्यांच्या सोयीसाठी परिवहन मंत्री यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एकूण ५,५०० विशेष बसेसची व्यवस्था केली आहे.

ग्रामीण भागातील वारकरी व भजनी मंडळींनी या विशेष बससेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि पारनेर आगाराच्या सेवेचा उपयोग करावा, असे आवाहन पारनेर आगार प्रमुख अमोल कोतकर यांनी केले आहे.

**संपर्क : आगार प्रमुख अमोल कोतकर : ९५४५३१६४१५**
**वाहतूक निरीक्षक इंद्रनील कुसकर : ९७३००४४१२१**
**वाहतूक निरीक्षक जगदीश कारखिले : ८२०८५५६०१७**

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ अकोल्यात रास्ता रोको

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आंदोलन; पोलिसांना निवेदन सादर

**● अकोले । वीरभूमी –**

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मंगळवारी अकोले येथील अगस्ती महाविद्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यानंतर पोलिस ठाण्यावर मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन पोलिस अधिकाऱ्यांना देण्यात आले.

या आंदोलनात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी, तालुकाप्रमुख महेश नवले, विधानसभा प्रमुख माधवराव तिटमे, उपजिल्हाप्रमुख प्रभाकर फापाळे, शहरप्रमुख नितीन नाईकवाडी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व विद्यार्थी सहभागी झाले होते.



निवेदनात केंद्र सरकारने सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून ताब्यात घेतल्याचा निषेध करण्यात आला आहे. तसेच नीट (छएएढ) प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. लोकशाहीत विरोधी पक्षांचा आवाज ऐकून घेणे आवश्यक असताना केंद्र सरकार दडपशाहीचे धोरण अवलंबत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला.

यावेळी विधानसभा प्रमुख माधवराव तिटमे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर टीका केली. तालुकाप्रमुख महेश नवले यांनी केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीवरही टीका करत निषेध व्यक्त केला.

आंदोलनानंतर अकोलेचे पोलिस निरीक्षक संदीप कोळी यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शेवगावात रक्तदान शिबिर

## 'सेवा यज्ञ - महारक्तदान संकल्प' उपक्रमांतर्गत ५६ रक्तपिशव्यांचे संकलन

**● शेवगाव । वीरभूमी –**

भारतीय जनता पार्टी, शेवगाव तालुक्याच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त आ. मोनिकाताई राजळे यांच्या शेवगाव येथील कार्यालयात 'सेवा यज्ञ – महारक्तदान संकल्प' या सामाजिक उपक्रमांतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला युवकांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाढदिवसानिमित्त जाहिराती, बॅनरबाजी आणि अनावश्यक खर्च टाळून सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात त्यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त प्रतीकात्मक ५६ रक्तपिशव्यांचे संकलन करून त्यांना अनोख्या पद्धतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

रक्तदान शिबिराचे आयोजन भाजपचे तालुका



मंडलाध्यक्ष महेश फलके व बोधेगाव मंडलाध्यक्ष संजय टाकळकर यांनी केले. न्यू अर्पण व्हॉलेंटरी रक्त केंद्र, अहिल्यानगरचे चेअरमन सुलक्षण शिंदे, राहुल हुंबे व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तसंकलनाचे काम केले.

यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब पाटेकर, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष सचिन वायकर, भीमराज सागडे, नगरसेवक डॉ. नीरज लांडे, गणेश कोरडे, खंडेराव बुलबुले, गणेशराव रांधवणे, भाजयुमो तालुकाध्यक्ष अनिल सुपेकर, सुधीर जायभाय, सोमनाथ वीर, सोमनाथ कळमकर, सुरेश बडे, अजय भारस्कर, सतीश लांडे, राहुल मालुसरे, राहुल सावंत, सौरव मुरदारे, अनंता उकिरडे, महादेव पाटेकर, रोहन फडके, अभी कबाडी, गणेश रणखांब, नारायण मडके, महादेव सातपुते, सुभाष बडदे, महादेव पवार, अभी अंधारे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असा संदेश देत युवकांनी नियमित रक्तदानाचा संकल्प करावा, असे आवाहन केले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अरुणोदय गोशाळेत चाऱ्याचे वाटप

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी सेलच्या वतीने समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शहरातील अरुणोदय गोशाळेत सात दिवस पुरेल इतक्या चाऱ्याचे वाटप करून गोसेवेचा संदेश देण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत पशुसंवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

स्व. अजित पवार यांच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजहिताला प्राधान्य देणारे उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. गोमातेची सेवा ही भारतीय संस्कृतीतील महत्त्वाची परंपरा असून गोशाळांच्या माध्यमातून निराधार जनावरांचे संगोपन करणाऱ्या संस्थांना समाजाने सहकार्य करणे ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या उपक्रमामुळे गोशाळेला सात दिवस पुरेल इतका चारा उपलब्ध झाला असून गोसेवेच्या कार्याला हातभार लागला आहे.

कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे शहर जिल्हाध्यक्ष दीपक खेडकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिक विधाते, शहर जिल्हा कार्याध्यक्ष नितीन घोडके, शहर जिल्हा उपाध्यक्ष किरण मेहेत्रे, संतोष हजारे, किरण जावळे, विक्रम बोरुडे, महेश सुडके, महेश गाडे, आशिष भगत, विश्वास शिंदे, संकेत लोंढे, वैभव नेमाने, शैलेश सत्रे, सुजल झुंजारे, सुनील शिंदे, निखिल ताठे, गणेश शेलार, प्रसाद भडके यांच्यासह कार्यकर्ते आणि गोसेवक उपस्थित होते.